# MT

Seat No. [ ]

2018 .... .... 1100

**MT - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - SEMI PRELIM - II - PAPER - V**

**Time : 3 Hours** **(Model Answer Paper)** **Max. Marks : 100**

## विभाग १ – गद्य

**उ.१ अ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.** 1

(i)

काँग्रेस हाऊसमध्ये काम न मिळाल्याने आईच्या मनात आलेले विचार

- मी माझ्या मुलाला खूप शिकवीन
- शिक्षणाशिवाय या जगात मान नाही

(ii) **कंसातील योग्य पर्याय निवडून रिकामी जागा भरा.** 1

त्यावेळी उत्तरपत्रिकेची किंमत फक्त असायची तीन पैसे.

(२) **(i) कारण लिहा.** 1

लेखकाला चाचणी परीक्षेची उत्तरपत्रिका घरूनच न्यावी लागे कारण लेखकाची शाळा गरीब होती.

**(ii) एका वाक्यात उत्तर लिहा.**

लेखकाच्या हायस्कूलमध्ये दर शनिवारी चाचणी परीक्षा घेण्यात येत असे. 1

(३) **व्याकरण :**

**(i) समानार्थी शब्द लिहा.** 1

(अ) सप्ताह - आठवडा (आ) जीवन - आयुष्य

**(ii) अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य पुन्हा लिहा.** 1

तो नाराज झाला, घराकडं मागं फिरला.

(४) **स्वमत :** 2

युनियन हायस्कूलमधले सगळे शिक्षक खूप प्रेमळ होते. त्यांची वृत्ती सेवाभावी होती. विद्यार्थ्यांना शिकवताना ते स्वत:ला झोकून देत असत. लेखकाच्या शालेय जीवनात त्यांनी अगदी निरपेक्ष भावनेने मार्गदर्शन केले. यामुळे लेखकाच्या शालेय अभ्यासाचा पाया पक्का झाला असे नाही तर आयुष्याचा पाया देखील पक्का झाला. त्यामुळेच लेखकाच्या मनात शिक्षणाबद्दल आंतरिक ओढ निर्माण झाली.

उ.१आ. **खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**(१) आकृतिबंध पूर्ण करा.** 2

(i) **मोटारीतून प्रवास करतांना अब्दुलच्या मनात निर्माण झालेले विचार**
- आज शन्नूला आणायला हवे होते.
- तिचा घुस्सा तरी कमी झाला असता

(ii) **शन्नोने अब्दुलला जेवायला दिलेले पदार्थ**
- चपाती
- वांग्याची भाजी

(२) (i) **कंसातील योग्य पर्याय निवडून रिकामी जागा भरा.** 1

त्याचा चेहरा <u>उदास</u> दिसत होता.

(ii) **कोण कोणास म्हणाले ते लिहा.** 1

**''नहीं, जी नहीं चाहता खानेकू।''**
- **कोण** → शन्नू
- **कोणास** → अब्दुलला

(३) **व्याकरण :**

(i) **समानार्थी शब्द लिहा.** 1

(अ) ताट - थाळी (आ) कर - हात

(ii) **तक्ता पूर्ण करा.** 1

| अ.क्र. | शब्द | प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| (i) | शन्नूला | ला | द्वितीया (एकवचन) |
| (ii) | अष्टमीचा | चा | षष्ठी (एकवचन) |

(४) **स्वमत :** 2

अब्दुलचा बांगड्यांचा व्यवसाय होता. आधीच जेमतेम चालणारा व्यवसाय आणि नेमका सणाच्या दिवशी आपले दुकान बंद ठेवून अब्दुल तपोवनातल्या स्त्रियांना बांगड्या भरण्यासाठी जात असे. शन्नो वारंवार अब्दुलला दुसरा व्यवसाय करण्यास सांगत होती. अत्यंत अल्प उत्पन्नात संसाराचा गाडा चालवणं तिला कठीण जात होतं. तिच्या मुलाच्या साध्या साध्या इच्छा तिला पूर्ण करता येत नव्हत्या. म्हणूनच ती, अब्दुलला नवीन धंदा सुरू करायला सांगत होती.

उ.१ इ. **खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **खालील कृती पूर्ण करा.** 2

(i) खरा ध्येयवादी याला म्हणावा - कशासाठी काय सोडायचे हे ज्याला बरोबर कळते त्याला

(ii) आफ्रिकेत धर्मोपदेश करणार नाही तर - फक्त वैद्यकीय मदतीचे काम करणार.

(२) **फक्त नावे लिहा.** 2

(i) लोकमान्य टिळक यांचा आवडीचा विषय - गणित

(ii) संत तुलसीदासांनी यांचा त्याग केला - पत्नी

(३) **व्याकरण :**

**खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांचे वचन बदलून वाक्य लिहा.** 2

(i) फक्त वैद्यकीय मदतीची कामे करीन.

(ii) ध्येयापुढे आवडी बाजूला साराव्या लागतात.

(४) **स्वमत :** 2

संत तुलसीदास यांचा जन्म इसवी सन १४९७ या वर्षी सध्याच्या उत्तर प्रदेश या राज्यातील चित्रकुट जिल्ह्यातील राजापूर येथे झाला. तुलसीदास यांनी भारतभर भ्रमण केले.तत्कालीन हिंदू समाजावर झालेली आक्रमणे पाहून ते अतिशय दु:खी झाले. त्यांनी भारतातील सर्व राजांना एकत्र आणण्यासाठी खूप प्रयत्न केले, पण हे प्रयत्न सफल झाले नाहीत. तरीही तुलसीदासांनी या आक्रमणाचे स्वरुप समजावून सांगितले. प्रबोधन केल्याने अनेक राजांनी सामना केला. सामान्य लोकांमध्येही त्यांनी जनजागृती केली. हिंदु धर्म हा एक आहे, त्यास पंथात विभागू नका हे त्यांनी सांगितले. तुलसीदासांनी रामलीला या नाट्य-प्रकाराची सुरुवात केली. काशी आणि अयोध्या येथे 'श्रीरामचरितमानस' आणि 'विनय पत्रिका' या रचना केल्या. आजचा सुप्रसिद्ध पाठ 'हनुमान चालीसा' ही तुलसीदासांची रचना आहे. 'श्रीरामचरितमानस' लिहिण्यास त्यांना प्रत्यक्ष भगवान श्रीराम यांनी आज्ञा केली होती असे मानतात. त्यांनी संस्कृतमधील 'वाल्मिकी रामायणाचे' अवधी भाषेत रूपांतर करून त्यांचे नाव 'रामचरितमानस' असे ठेवले. हे लेखन त्यांनी निव्वळ सव्वीस दिवसात पूर्ण केले.

## विभाग २ – पद्य

**उ.२ अ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.** 2

(i) **कवी नारायण सुर्वे हिशोब करतात.** → डोईवर राहिलेल्या उन्हाळ्यांचा

(ii) **शेकडो वेळा आला** → चंद्र

(२) (i) **योग्य पर्याय निवडून चौकट पूर्ण करा.** 1

कवीने याचा विचार हरघडी केला - दुनियेचा

(ii) **'पोलाद' असे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.** 1

झोतभटटीत काय शेकावे ?

(३) कवी नारायण सुर्वे यांच्या जीवनसंघर्षाचे वर्णन दोन दिवस या कवितेतून केले आहे. कवी म्हणतो की जीवनातल्या दु:खाला न घाबरता न डगमगता सामोरे जावे. कारण दु:ख माणसाला खूप काही शिकवून जाते. दु:खावर मात करत असतांना आपल्यातल्या अनेक क्षमतांची अनुभुती येऊन परिस्थितीवर मात करणे, समायोजन करणे, नवीन पर्याय शोधणे अशा अनेक बाबीतून दु:ख पेलण्याची ताकद माणसात निर्माण होते. म्हणून कवी म्हणतो की, जीवनातल्या दु:खाने निराश, हताश न होता सामर्थ्याने विपरित परिस्थितीला सामोरे जावे आणि जीवनात पुन्हा ताकदीने उभे रहावे. हेच जीवनचे खरे सार आहे. 2

(४) 'दोन दिवस' या नारायण सुर्वे यांच्या कवितेवरून विविध सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक कष्टकऱ्यांचे जीवनचित्र समोर उभे राहते. अनेक ठिकाणी, अनेक प्रकारचे कष्ट आणि अत्यंत श्रमाचे काम करणारे कष्टकरी आपण पाहतो. ऊन, वारा, पाऊस अशा सगळ्या गोष्टी अंगावर झेलून ते सदैव श्रम करत असतात. जीवनासाठी लागणाऱ्या आवश्यक गोष्टी त्यांना उपलब्ध करून दिलेल्या नसतात. जीवनाची हमी नसते. अत्यंत कमी वेतनावर ते प्रचंड मेहनतीचे काम करत असतात. त्यांना जीवन जगणे खूप कठीण जाते. रोज काम मिळण्याची शाश्वती नसते. तरी ही उद्याच्या चांगल्या दिवसाच्या आशेवर ते जगत असतात. अशाप्रकारे आपल्या देशात कष्टकऱ्यांचे जीवन अत्यंत कठीण आहे. 2

**उ.२ आ. दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी पुढील कृती सोडवा :**

(i) **योगी सर्वकाळ सुखदाता**

(१) **कवी/कवयित्री : –** 1

संत एकनाथ

(२) **कवितेचा रचनाप्रकार : –** 1

'योगी सर्वकाळ सुखदाता' ही कविता एक 'अभंग' आहे.

| | | |
|---|---|---|
| (३) | **कवितेचा काव्यसंग्रह : –**<br>'योगी सर्वकाळ सुखदाता' हा अभंग 'एकनाथी भागवत' शासकीय प्रत' या संग्रहातून घेतला आहे. | 1 |
| (४) | **कवितेचा विषय : –**<br>योगी पुरूषाचे समाजातील सामाजिक कार्य समजावून देणारा आणि त्याचे श्रेष्ठतत्त्व स्पष्ट करणारा 'योगी सर्वकाळ सुखदाता' हा एक सुंदर अभंग आहे. | 1 |
| (५) | **कवी/कवयित्रीची लेखन वैशिष्ट्ये : –**<br>मनातील भाव सहज व्यक्त होईल असा 'अभंग' हा मराठीचा जुना पूर्वापार चालत आलेला छंद कवितेसाठी योजला आहे. या अभंगातून शांतरस दिसून येतो. कवीची भाषाशैली अत्यंत रसाळ असून चित्रदर्शी आहे. पाण्याची आणि योगी पुरूषाची तुलना करताना मळ, निर्मळ, एकवेळ, सर्वकाळ असे शब्द वापरून छान यमक साधले आहे. कवीच्या भाषिक वैशिष्ट्यात येणे, पावणे, कीर्तने, निजज्ञाने या शब्दांमुळे नादमाधुर्य निर्माण झाले आहे. | 2 |
| (६) | **मध्यवर्ती कल्पना : –**<br>पाणी तहान शमवते व काही काळापुरते संतुष्टी देते. पाण्यामुळे शेतीतून अन्नधान्य मिळते. भूक भागवणे, तहान शमवणे, मळ घालवणे, स्वच्छता करणे हे पाण्याचे कार्य आहे. अशा या पाण्याची तुलना संत एकनाथांनी योगी पुरूषाबरोबर केली आहे. योगी ज्ञान दान करून सर्वेंद्रिय तृप्त करतात. योगी इहलोकात जन्म घेऊन सर्व लोकांना कीर्तन-प्रबोधनाद्वारे आत्मज्ञानाचे निरंतर सुख देतात. योगी पुरूष व पाणी दोघेही समाजासाठी अमूल्य आहेत. | 2 |
| (ii) | **अंकिला मी दास तुझा** | |
| (१) | **कवी/कवयित्री : –**<br>संत नामदेव | 1 |
| (२) | **कवितेचा रचनाप्रकार : –**<br>'अंकिला मी दास तुझा' ही कविता एक 'अभंग' आहे. | 1 |
| (३) | **कवितेचा काव्यसंग्रह : –**<br>'अंकिला मी दास तुझा' हा अभंग 'सकलसंतगाथा खंड पहिला : श्रीनामदेवमहाराजांची अभंगगाथा अभंग कमांक १६६१ - संपादक : प्रा. डॉ. र. रा. गोसावी' या संग्रहातून घेतला आहे. | 1 |
| (४) | **कवितेचा विषय : –**<br>आई, प्राणी, पक्षी यांच्या विविध दृष्टांतातून मातृप्रेमाचे वर्णन करीत संत नामदेवांनी 'अंकिला मी दास तुझा' या अभंगामध्ये परमेश्वर कृपेची याचना केलेली दिसून येते. | 1 |

| | | |
|---|---|---|
| (५) | **कवी/कवयित्रीची लेखन वैशिष्ट्ये : –**<br>वारकरी संप्रदायातील थोर संतकवी संत नामदेव यांची अभंगरचना अतिशय उत्कट अशी आहे. त्यांच्या अभंगाची भाषा अतिशय सुबोध, सरळ व साधी अशी आहे. रोजच्या जीवनातील उदाहरणे वापरून नामदेवांनी मातृप्रेमाची उत्कटता व्यक्त केली आहे. आई, पक्षिणी, गाय, हरिणी तसेच चातक यांची उदाहरणे देत संत नामदेवांनी करूण रसाचा परिचय करून दिलेला आहे. | 2 |
| (६) | **मध्यवर्ती कल्पना : –**<br>संत नामदेवांनी भगवान विठ्ठलाची तन, मन, धन अर्पण करून भक्ती केली आहे. उत्कट भक्तीद्वारे त्यांनी विठ्ठलाशी जणू आई-मुलाचे नाते जोडले आहे. ते श्री विठ्ठलास आपली माऊली (आई) मानतात. ज्याप्रमाणे आपले बाळ अडचणीत, संकटात असेल तर त्याची आई चिंतित होते, काळजी करते. पिल्लासाठी पक्षिणी, भुकेलेल्या वासरासाठी गाय धावून येते, पाडसासाठी हरिणी चिंतित होते त्याचप्रमाणे परमेश्वराने आपल्या प्रत्येक कार्यात धावून यावे, आपली मदत करावी अशी याचना संत नामदेव करतात. | 2 |
| उ.२ इ.<br>(१) | **खालील ओळींचे रसग्रहण करा.**<br>'अंकिला मी दास तुझा' या अभंगात संत नामदेवांनी विविध दृष्टान्तांतून परमेश्वर कृपेची याचना केली आहे.<br>आगीमध्ये एखादे लहान बाळ सापडले हे त्याच्या आईस दिसल्यावर त्यास वाचवण्यास ती माता व्याकूळ, अगतिक होऊन त्या आगीमध्ये धाव घेते. त्याचप्रमाणे हे परमेश्वरा तू माझ्या प्रत्येक कार्यास मदत करण्यास धावून ये. कारण मी पूर्णपणे, सर्वस्वी तुझा दास आहे. असे संत नामदेव या ठिकाणी सांगतात.<br>येथे संत नामदेवांनी विविध कल्पनांचा वापर करून आपल्या मनातील उद्विग्नता स्पष्ट केली आहे. प्रस्तुत ओळीतून करूण रसाचा परिचय येतो. नामदेवांनी आपल्या अभंगातून एक आंतरिक लय साधली असून साध्या सरळ भाषेची रचना केलेली दिसते. | 4 |
| | **विभाग ३ – स्थूलवाचन** | |
| उ.३.<br>(१) | **खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.**<br>'बार्क' हे 'भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर' म्हणजे 'भाभा अणुसंशोधन केंद्र' या नावाचे लघुरूप आहे. डॉ. होमी भाभा यांनी भारतातील अणुसंशोधनाचा पाया घातला. त्यांची आठवण म्हणून त्यांचे नाव या संस्थेला दिलेले आहे. ही संस्था आता प्रचंड मोठी झालेली आहे. अणुसंशोधनाच्या क्षेत्रात कार्य करू पाहणाऱ्या अनेक नवीन मुलांना तिथे कार्य करण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते. अनेक मुले इथल्या ट्रेनिंग स्कूलमध्ये संशोधन करत असतात. योग्य प्रशिक्षण घेऊन स्वत:ला सक्षम करून स्वत:चे मार्ग शोधून पुढे जातात, आपले उज्ज्वल भविष्य घडवत असतात. | 3 |
| (२) | सूर्य उदयाला येतो त्याबरोबर संपूर्ण धरा तेजोमय होते. चैतन्याने भरून जाते, संपूर्ण चराचराचे जीवनचक्र फिरू लागते. म्हणून अस्ताला जातांना सूर्याच्या मनात विचार येतो, मी अस्ताला गेल्यानंतर ही संपूर्ण धरा/पृथ्वी अंधारात बुडून जाईल. माझ्या प्रकाशाचा एक साधा कवडसाही उरणार नाही. मग या पृथ्वीवरील जीवांचं काय | 3 |

होईल ? हा मिट्ट अंधार विश्वाच्या चैतन्याला संपवून तर टाकणार नाही ना ? या विश्वाच्या चराचरात/अणुरेणूत सामावलेले जीवन, चैतन्य हा अंधार गिळून तर टाकणार नाही ना ? अनामिक भीती त्याला छळू लागते. पृथ्वीला अंधारापासून कोणीतरी वाचवलं पाहिजे. विश्वाचे कोणीतरी भले करावे. मी अस्ताला गेल्यानंतर कोणीतरी माझे कार्य करावे या सुंदर विश्वाला प्रकाशमान करावे असे त्याला वाटते.

कवितेतली आशयावरून सूर्य हा जणू पृथ्वीचा जनक आहे, असे वाटते. एखाद्या पित्याला आपल्या कन्येच्या भल्याची, तिच्या चांगल्या जीवनाबद्दल चिंता असते तसाच सूर्य देखील धरेची काळजी घेणारा तिला जपणारा पिता आहे असे प्रतीत होते.

(३) वेगवेगळ्या ठिकाणचा सूर्यास्त वेगवेगळे सौंदर्य, वेगळे भाव, वेगळे रंग निर्माण करत असतो. माणसाची मनोदशा जशी असेल तसे भावतरंग सूर्यास्ताच्या वेळी त्याच्या मनात निर्माण होत असतात. **3**

वाळवंटाच्या ठिकाणचा सूर्यास्त. वाळूच्या विस्तीर्ण पसरलेल्या अथांग भूप्रदेशावर सोनेरी मऊसार किरणे पसरवत असतो. मन अगदी तृप्त करून तो अस्ताला जातो. तेथील वाळूचा सागर हळूहळू थंड होत जातो. शितल वाऱ्याच्या झुळका वाहू लागतात. मानव, पशू, पक्षी सुखावून जातात. वाळूचा थंड स्पर्श, वाऱ्याची थंड झुळूक यामुळे मानवी मन सुखावून जाते. त्या सुवर्णमयी वातावरणात नव्या संकल्पना, जुन्या संवेदना जाग्या होतात. कवी, लेखक, चित्रकार यांना नवीन कल्पना सुचतात.

समुद्राच्या ठिकाणी अस्ताला जाणाऱ्या सूर्यास्ताचे दर्शन मोठे विलोभनीय असते. हळू हळू सागराच्या कुशीत सामावणाऱ्या सूर्याला बघून वाटते की, हा सागरात मिसळून जातो. म्हणूनच चमकदार मोती निर्माण होतात. सुंदर रंगीत प्रवाळ आणि अनंत असे जीव निर्माण होतात. समुद्राच्या लाटांसोबत हेलकावे खात हा तेजोगोल जेव्हा सागरात सामावतो तेव्हा आपोआप त्या सृष्टीकर्त्यापुढे आपण नतमस्तक होतो.

## विभाग ४ – भाषाभ्यास

उ.४ **(अ) भाषाभ्यासावर आधारित कृती**

(i) **समास** **2**

| अ.क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (i) | जागोजागी | प्रत्येक जागी | अव्ययीभाव समास |
| (ii) | पालापाचोळा | पाला, पाचोळा वगैरे | समाहास द्वंद्व समास |

(ii) **अलंकार** **2**

**अलंकार - अनुप्रास अलंकार**

**उदा.** संत म्हणति, 'सप्त पदें सहवासें सख्य साधुशी घडतें।

(iii) **वाक्यरूपांतर** **2**

| अ.क्र. | वाक्य | वाक्याचा प्रकार | सूचनेनुसार बदल करा. |
|---|---|---|---|
| (i) | अब्दुल, बसस्टॉपवर ये. | आज्ञार्थी वाक्य | अब्दुलने बसस्टॉपवर यावे. |
| (ii) | स्टेशन इथून जवळ नव्हते. | नकारार्थी वाक्य | स्टेशन इथून लांब होते. |

(iv) **सामान्यरूप** 2

**दिलेल्या शब्दांचे मूळशब्द व सामान्यरूप असे वर्गीकरण करा.**

| अ.क्र. | शब्द | मूळशब्द | सामान्यरूप |
|---|---|---|---|
| (i) | तुरुंगात | तुरुंग | तुरुंगा |
| (ii) | संसाराच्या | संसार | संसारा |

(v) **वाक्प्रचार** 2

**खालील कंसातील वाक्प्रचार वाक्यात योग्य ठिकाणी वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

(i) ज्यांनी माझ्या उपासाची अवहेलना केली होती, त्यांनीच मला डाएटचा सल्ला दिला.

(ii) बाहेर कामाशिवाय जायचे नाही, अशी वडिलांनी मला सक्त ताकीद दिली.

उ.४ **(आ) भाषासौंदर्य**

(१) **शब्दसंपत्ती** 1

(i) **खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.**

(अ) दूसऱ्यावर अवलंबून असणारा - परावलंबी

(आ) आधी जन्माला आलेला - अग्रज

(ii) **खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** 1

(अ) दक्षीण × उत्तर (आ) स्तुती × निंदा

(iii) **पुढील शब्दांचे भिन्न अर्थ लिहा.** 1

अभिमान, शोभा ← भूषण → दागिना

(iv) **खालील शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा.** 1

तिळपापड - तिळ, पापड, पाड, पाळ, पड, पाप, पळ

(२) **लेखननियमांनुसार लेखन**

(i) **खालील वाक्य लेखननियमानुसार शुद्ध करून लिहा.** 1

महिन्यापूर्वी याच यंत्राने माझे वजन एकशे **एक्याऐंशी** पौंड दाखवले होते.

(ii) **अचूक शब्द ओळखून लिहा.** 1

(अ) सौंदर्य

(आ) स्मृतिदिन

| | | |
|---|---|---|
| (३) | **विरामचिन्हे**<br>**खालील वाक्यातील चुकीची विरामचिन्हे बदलून वाक्ये पुन्हा लिहा.**<br>(i) कुठं चिरण्या नाहीत की काही नाही!<br>(ii) तुम्हां टेक्नोसॅव्ही लोकांना कशाचंही ॲप करण्याशिवाय काही सुचतं की नाही ? | **2** |
| (४) | **पारिभाषिक शब्द**<br>**खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा.**<br>१. Computer - संगणक २. Good will - सदिच्छा | **1** |
| (५) | **भाषिक खेळ**<br>**खालील शब्द अकारविल्हेनुसार लावा.**<br>वीणा, वैभव, शारदा, शीतल, | **1** |
| | **विभाग ५ – उपयोजित लेखन** | |
| उ.५ अ. | **खालील कृती सोडवा.** | |
| (१) | **पत्रलेखन** | |
| (i) | दि. ५ सप्टेंबर, २०१८<br><br>प्रति,<br>मा. विभागीय अधिकारी,<br>मुंबई महानगरपालिका,<br>मुंबई.<br><br>विषय – शाळेसमोरील रस्ता नादुरुस्त असल्याकारणाने तक्रार पत्र....<br><br>माननीय महोदय,<br>सप्रेम नमस्कार.<br>मी अ. ब. क., एक त्रस्त पालक आपणास पत्र लिहीत आहे. माझा मुलगा ज्ञानदीप विद्यालयात इयत्ता ३ री मध्ये शिकतो. या शाळेसमोरील रस्ता गेले दोन महिने अतिशय खराब स्थितीत आहे. बऱ्याच वेळा तक्रार करूनही त्याच्या दुरुस्तीकडे लक्ष दिले जात नाही. आता ऐन पावसाळ्याचे दिवस आहेत. रस्त्यावरील खड्ड्यात बरेच पाणी साचत आहे. त्यामुळे रस्त्यावर चालणेच त्रासाचे आहे.<br>येथे वाहनांची कोंडी होत आहे. विशेष करून शाळा सुटण्याच्या वेळेस फारच गर्दी होते. शिवाय खड्ड्यात पाणी तसेच साचून राहिल्याने तेथे कचरा, घाण जमा होऊन दुर्गंधी व मच्छर यांचा त्रास वाढला आहे. रहदारीची कोंडी झाल्यामुळे सतत गाड्यांचे हॉर्न वाजत असतात. | **5** |

| | | |
|---|---|---|
| | तरी कृपया या तक्रारीकडे आपण वैयक्तिक लक्ष देऊन योग्य ती कार्यवाही करावी, ही नम्र विनंती.<br>कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.<br><br>आपला नम्र,<br>अ. ब. क.<br><br>१०१, पारिजातक,<br>ला. ब. शास्त्री मार्ग,<br>भांडूप (पूर्व). | |
| (ii) | दि. ५ जानेवारी, २०१८<br><br>प्रति,<br>मा. विभागीय अधिकारी,<br>मुंबई महानगरपालिका,<br>मुंबई.<br><br>विषय – मच्छर प्रतिबंधक योजना राबविण्यासाठी विनंती पत्र...<br>माननीय महोदय,<br>सप्रेम नमस्कार.<br>मी अ. ब. क., संजीवनी निवास, मुलुंड (प). या विभागात राहत असून मच्छर प्रतिबंधक योजना राबविण्यासाठी विनंती पत्र लिहीत आहे.<br>पावसाळा संपून काही आठवडे झाले आहेत. त्यामुळे सर्वत्र खाचखळग्यांत पाणी साचून राहिले आहे. तसेच नाल्यातही पाणी साचून राहिले आहे. या साचलेल्या पाण्यामुळे मच्छरांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे मलेरिया, डेंग्यू यांसारखे गंभीर आजार पसरण्याची शक्यता आहे.<br>आमच्या विभागात लहान मुलांची संख्या जास्त आहे. आपण कृपया या तक्रारीची नोंद घेऊन त्वरीत मच्छर प्रतिबंधक योजना राबवावी, एक पालक म्हणून आपणास ही नम्र विनंती.<br>कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.<br><br>आपला विश्वासू,<br>अ. ब. क.<br><br>संजीवनी निवास,<br>मुलुंड (प.), मुंबई. | 5 |
| (२) | **सारांश लेखन**<br>**खालील उतारा वाचा व त्याचा एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**<br>खऱ्या ध्येयवादी लोकांना कशासाठी काय सोडायचे हे बरोबर कळते. आपली आवड बाजूला सारून ते खडतर अशा ध्येयाशी मैत्री करतात. त्यामुळेच आफ्रिकेत धर्मोपदेश करायचे सोडून डॉ. खाइत्सर वैद्यकीय मदत करत होते. गणिताची आवड बाजूला सारून देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात लोकमान्य टिळकांनी स्वत:ला वाहून घेतले. तसेच संत तुलसीदासांनी देवाच्या सेवेसाठी प्राणप्रिय पत्नीचा आणि संभाजी महाराजांनी धर्माच्या सेवेसाठी आपल्या देहाचा त्याग केला. | 5 |

उ.५ आ. **खालील कृती सोडवा.**

(१) **खालील विषयावर बातमी तयार करा.** 6

**आमच्या वार्ताहराकडून** दि. २१ मार्च २०१८

**इंधन दरवाढीचा शेतकऱ्यांना फटका**

रत्नागिरी: पेट्रोल, डिझेलच्या दरांत सातत्याने वाढ होत असल्याने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. बहुतांश शेतकरी शेतीची कामे ट्रॅक्टरच्या साहाय्याने करतात. सध्या मशागतीची कामे सुरू असून, ट्रॅक्टरद्वारे होणाऱ्या कामाच्या खर्चात वाढ झाल्यामुळे डिझेल दरवाढीचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे.

या आठवड्यात इंधन दरवाढीने कहर केला असून, त्याचे तीव्र पडसाद सोशल मिडीयावरही उमटू लागले आहेत. गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने इंधनाच्या दरात वाढ होत आहे.सध्या जवळपास ८५ रूपये प्रतिलिटर पेट्रोल तर डिझेलही ७२ रूपयांवर पोहोचले आहे. शेतकऱ्याचा भाजीपाला व इतर शेत माल बाजारात पोहोचवण्याच्या खर्चातही दुपटीने वाढ झाली आहे. उत्पादन खर्चही शेतकऱ्यांना मिळत नाही. त्यामुळे सर्वसामान्यांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

(२) **खालील दिलेल्या मुद्द्यांवरून कथा तयार करा. कथेला योग्य शीर्षक द्या.**

**करावे तसे भरावे** 6

सोनापूर गाव नावाप्रमाणेच सोन्यासारखे सुंदर होते. निसर्गाने जणूकाही मुक्त हस्ताने सौंदर्य उधळले होते या गावावर. गावातून एक नदी वाहत होती. याच छोट्याशा गावात रामू नावाच्या एका शिंप्याचे दुकान होते.

गावात एकदा सर्कस आली. सर्कशीतला हत्ती रोज नदीवर स्नानासाठी जाई. जाताना तो शिंप्याच्या दुकानापाशी थांबे. शिंपी त्याला रोज काही ना काही खायला देत असे. मग हत्तीसुद्धा खूश होऊन त्याला सोंडेने सलाम करीत असे.

एके दिवशी, शिंप्याच्या मनात विचार आला की, आपण या हत्तीची गंमत करावी. नेहमीप्रमाणे हत्ती नदीवर जाताना शिंप्याच्या दुकानाजवळ आला. पण आज मात्र खाऊ देण्याऐवजी त्याने हत्तीच्या सोंडेला सुई टोचली. अरेरे! बिचारा हत्ती! वेदनेने कळवळला, पण आपले दु:ख बिचाऱ्या मुक्या जनावराला व्यक्त करता येईना. तो तसाच पुढे नदीवर गेला. मनात मात्र शिंप्यावरचा राग धुसफुसत होता. त्यानेही रामूला धडा शिकविण्याचे ठरविले.

आंघोळ करून झाल्यावर हत्तीला युक्ती सुचली. नदीजवळच एक घाणेरड्या पाण्याचे डबके होते. त्याने ते घाणेरडे पाणी आपल्या सोंडेत घेतले व तो शिंप्याच्या दुकानाजवळ परत आला. शिंपी कपड्यांचा पसारा काढून कपडे शिवत बसला होता. त्याने ते सोंडेतले घाणेरडे पाणी शिंप्याच्या दुकानातील सर्व कपड्यांवर उडवले. अशाप्रकारे त्याने शिंप्याला चांगलाच धडा शिकवला.

उ.५ इ. **लेखनकौशल्य**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.**

(१) **किल्ल्याचे आत्मवृत्त** ४

काय ओळखलंत का? तसा तुम्ही मला ओळखण्याचा प्रश्नच कुठे येतो म्हणा! अहो, बंद दाराच्या पिंजऱ्यात राहणारे तुम्ही, तुम्हांला कसं कळणार आमचं मर्दानी आयुष्य, गनिमी कावे, मावळ्यांचे शौर्य, महाराजांचे स्वप्न आणि माझे राजवैभव! आता ही माझ्या कानात 'हर हर महादेव'ची गर्जना घुमू लागते आणि नसानसातून माझं लढवय्या रक्त वाहू लागतं.

'राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा
प्रणाम घ्यावा माझा हा श्री महाराष्ट्र देशा'

असं वर्णन ज्या महाराष्ट्र देशाचं केलं जातं, त्या देशात जन्म घेणं यापेक्षा अधिक भाग्य दुसरे ते काय! काळाचा पडदा एकामागे एक उलगडत जातो आणि माझाच चित्रपट मी स्वत:च्या नजरेने पाहू लागतो कारण मी साक्ष असतो त्या गौरवशाली इतिहासाची! रायरीचा रायगड आणि कोंढाण्याचा सिंहगड होणं इतकं सोप नव्हतं. आजही तुमचे कवी वसंत बापट बोलून जातात,

'भव्य हिमालय तुमचा अमुचा, माझा केवळ सह्यकडा,
गौरीशंकर उभ्या जगाचा, मनात पूजीन रायगडा।'

सह्याद्रीच्या उभ्या-आडव्या पसरलेल्या रांगा आणि त्यात महाराष्ट्रात वाढत चाललेला अत्याचार. खरं तर कृष्णदेवरायाच्या मृत्यूनंतर महाराष्ट्राला तसा कोणी वालीच उरला नव्हता पण शिवनेरीवर शिवबाचा जन्म झाला आणि मी पुन्हा एकदा पावन झालो. अगदी लहान वयात शिवाजीने तोरणा सर केला आणि हिंदवी स्वराज्याचे तोरण बांधले गेले. हिंदवी स्वराज्याची नव्याने पहाट झाली. 'शिवरायांचे आठवावे रूप, शिवरायांचा आठवावा प्रताप' असे रामदास स्वामी म्हणत ते काही खोटे नाही. शिवरायांच्या पराक्रमाने मी कृतार्थ झालो. महाराजांच्या दूरदृष्टीतून आम्हांला वैभव प्राप्त झाले. संगमरवरी जागतिक आश्चर्य बनवण्यापेक्षा आम्हांला काळाची गरज म्हणून महाराजांनी महत्त्व प्राप्त करून दिले.

महाराजांच्या शब्दासाठी जिवाची बाजी लावणारे बाजीप्रभू देशपांडे, मुलाच्या लग्नापेक्षा कर्तव्याला आधी झुकतं माप देणारा तानाजी, नेताजी पालकर, हंबीरराव मोहिते, संताजी-धनाजी, कान्होजी आंग्रे, मुलाच्या ओढीने किल्ल्याचा बुरूजदेखील उतरून जाणारी हिरकणीसारखी आई हे सर्व हिरे-मोती माझ्याच अंगाखांद्यावर तर खेळले. आज देखील महाराष्ट्राचा गौरवशाली वारसा म्हणून तरूण पिढी आमच्याकडे पाहते तेव्हा मी धन्य धन्य होतो. मग स्वत:शीच गुणगुणू लागतो,

'बहु असोत सुंदर, संपन्न की महा
प्रिय अमुचा एक, महाराष्ट्र देश हा'

एखादा गिर्यारोहक आपला पराक्रम दाखविण्यासाठी माझ्यावर सरसर स्वार होतो आणि मला माझ्या मावळ्या मुलाची आठवण देऊन जातो. इतिहासप्रेमी मंडळी मला गतवैभव प्राप्त करून द्यायला जीवाचं रान करतात तेव्हा माझ्या दगडांतून देखील अभिमानाचे आनंदाश्रू वाहू लागतात. लहान मुलांना इतिहासासारख्या विषयातून आमची ओळख होते आणि आम्ही आमचे उज्ज्वल भविष्य डोळ्यांनी पाहू लागतो.

कधीतरी वाईट ही वाटतं, एखादा प्रियकर आपल्या प्रेमिकेचे नाव दगडावर कोरून जातो तेव्हा ओरडून सांगावसं वाटतं, मी पोकळ प्रेमाची नाही तर जाज्वल्य शौर्याची निशाणी आहे. माझे ढासळणारे बुरूज पाहिले की सांगावसं वाटतं, फक्त जयंत्या आणि पुण्यतिथ्या साजऱ्या करू नका, महाराजांचा वारसा खऱ्या अर्थाने पुढे चालविण्याचा प्रयत्न करा.

काळ बदलतो तशी परिस्थिती देखील बदलते. नव्या शतकानुसार कदाचित आम्ही कालबाह्य ठरत

असू. पण आम्हाला नष्ट करू नका. अहो! इजिप्त, रोम, इटलीसारखे देश ऐतिहासिक वारशांवरच तर स्वत:चे वैभव वाढवू शकले. आमचीदेखील तशीच काळजी घ्या आणि परदेशी पर्यटकांना आकर्षित करा. शेवटी काय?

‘स्वराज्य तोरण चढे, वाजती तोफांचे चौघडे
मराठी पाऊल पडते पुढे’ बरोबर ना!

(२) **मी चित्रकार झालो तर ...** ४

एकदा सहज अभ्यास करता करता आफ्रिकेविषयी माहिती मिळवावी. म्हणून गुगलवर सर्च करत असतात माझ्या लक्षात आले की, सर्च इंजन गुगलवर जगप्रसिद्ध भारतीय चित्रकार जेमिनी रॉय यांच्या १३०व्या जयंती निमित्त त्यांच्या कलेतून साकारलेल्या चित्राचे डुडल तयार करून त्यांच्या कार्याचा गौरव केलेला दिसला. तेव्हा माझ्या मनात विचार आला मी चित्रकार झालो तर.......

लहानपणापासून मला चित्रकला या विषयात गोडी आहेच आणि त्याची सुरुवात बाईंनी फळ्यावर काढलेल्या सुंदर मोरापासून झाली. त्यानंतर अनेक माध्यमातून वेगवेगळी चित्रे माझ्या डोळयासमोर आली. मग ती पंचतंत्र पुस्तकातील प्राण्यांची असोत किंवा परिकथेच्या पुस्तकातील जादूई महालाची. ही चित्रे मला वेगळ्याच कल्पनाविश्वात घेऊन जायची. दिवाळी अंकातील ती विनोदी चित्रे, व्यंगचित्रे, वर्णन करण्यासाठी शब्दाचे माध्यम अपुरे पडणारी अशी अनेक मोठ्या चित्रकारांची चित्रे अशाप्रकारच्या चित्रांची आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर भेट होत गेली. याचा सारासार विचार करता चित्राविषयी किंवा चित्रकाराविषयी मी असा निष्कर्ष काढू शकतो की, चित्रकाराजवळ जशी नवनिर्मिती क्षमता असते. त्याचप्रमाणे एखादा चित्रकार त्याच्या चित्रातून समजात तेढ, वादही निर्माण करू शकतो. समाजातील एखाद्या ज्वलंत प्रश्नावर विचार करावयास लोकांना भाग पाडू शकतो तर एखादा चित्रकार एखाद्या सामान्य माणसाला रोजच्या ताण-तणावातून बाजूला सारून नयनसुखाचा रम्य आनंदही देऊ शकतो.

मग चित्रात इतकी शक्ती असताना त्याचा उपयोग चांगल्या कारणांसाठी करून घेणारा चित्रकार मी बनेन. असे म्हणतात की, १०० शब्दांचे काम एकच चित्र करते आणि म्हणूनच माझ्या चित्रांतून काहीतरी सामाजिक संदेश लोकांपर्यंत पोहोचवावा अशा उद्देशाने चित्राचे रेखाटन मी करेन. ख्यातनाम दर्जाचा चित्रकार झालो नाही तरी, माझ्या चित्राने पाहणाऱ्याच्या चेहऱ्यावर स्मितहास्य आणावे अशी माझी इच्छा आहे. निसर्गातील वेगवेगळ्या रंगांची उधळण माझ्या चित्रातून व्हावी यासाठी मी प्रयत्न करेन.

❖❖❖❖❖